# <u>प्रेसनोट</u>

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. १०/०८/२०१८

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी आळंदी विभागातील कनिष्ठ अभियंत्यास पाच रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांचा विज पुरवठा खंडीत करण्यात आला होता व त्यांचे विज मीटर काढून नेले होते. म्हणून तक्रारदार यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या आळंदी विभागाकडे पाठपुरावा करत होते. त्यावेळी तेथील कनिष्ठ अभियंता गणेश जरंडे याने तक्रारदार यांना खंडीत केलेला विज पुरवठा पुन्हा सुरळीत करण्यासाठी व नवीन मीटर मंजूरी करून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रूपये लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक ०९/०८/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक गणेश जरंडे कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी आळंदी विभाग याने तक्रारदार यांचा खंडीत केलेला विज पुरवठा पुन्हा सुरळीत करण्यासाठी व नवीन मीटर मंजूर करून देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५,०००/- रूपये लाचेची मागणी केली.

त्यावरुन आज दिनांक १०/०८/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक गणेश पांडुरंग जरंडे, वय - २८, कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी आळंदी विभाग ता. खेड याने तक्रारदार यांचेकडून ५,०००/- रूपयांची लाचेची रक्कम आळंदी येथील कार्यालयात स्विकारल्यावर त्याला रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर आळंदी पोलीस स्टेशन स्टेशन, पुणे ग्रामीण, येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**
८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

( सुहास नाडगौडा )
सहा.पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.